# सर्वांत महत्त्वपूर्ण अटी व शर्ती

Version 1.48

HDFC BANK
We understand your world

## 1. शुल्क आणि प्रभार

### A. कार्ड सभासदाद्वारे क्रेडिट कार्डावर प्रदेय असणारे शुल्क

- वार्षिक शुल्क
- नुतनीकरण शुल्क

प्रत्येक कार्ड सभासदासाठी, आणि प्रत्येक ऑफरनुसार शुल्क वेगवेगळे असू शकते. सदरबाबत क्रेडिट कार्डाकरिता अर्ज करण्याच्या वेळी कार्ड सभासदाला कळविण्यात येते. लागू असणारे वरील शुल्क हे कार्डाच्या खात्यामध्ये आकारण्यात येते आणि ज्या महिन्यात सदर शुल्क आकारण्यात आलेले आहे, त्या महिन्याच्या कार्ड विवरणामध्ये ते शुल्क नमूद करण्यात येते.

### B. अग्रिम रोकड शुल्क

गरजेच्या प्रसंगी कार्ड सभासदाला भारतामधील किंवा विदेशामधील एटीएम्समधून कार्डाद्वारे रोख रक्कम प्राप्त करता येऊ शकते. काढण्यात आलेल्या रकमेवर 2.5% (किमान रु.300/-) इतके व्यवहार शुल्क आकारण्यात येते आणि पुढील विवरणामध्ये ते कार्ड सभासदाच्या देयकामध्ये समाविष्ट करण्यात येते. व्यवहार शुल्क हे एचडीएफसी बँकेच्या निर्णयानुसार बदलाच्या अधीन असते. सर्व अग्रिम रकमांवर, रक्कम काढण्याच्या तारखेपासून ते पूर्ण भरणा करेपर्यंत परिक्रामी क्रेडिटवरील प्रभारांइतका (कृपया प्रभारांच्या अनुसूचीचा संदर्भ घ्या) वित्तीय प्रभारदेखील आकारण्यात येतो. वित्तीय प्रभार हा एचडीएफसी बँकेच्या निर्णयानुसार बदलाच्या अधीन असतो.

### C. प्रभार

(i) एचडीएफसी बँकेद्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या विशिष्ट सेवांसाठी किंवा कार्ड सभासदाने त्याच्या कार्ड खात्याच्या संदर्भानुसार केलेल्या डिफॉल्टसाठी, वेळोवेळी लागू असतील त्याप्रमाणे, प्रभार आणि शुल्क हे कार्ड सभासदाद्वारे प्रदेय असतात.

(ii) एचडीएफसी बँक ही ग्राहकाला यथोचितरीत्या कळविल्यानंतर, योग्य वाटेल त्याप्रमाणे, वेळोवेळी कोणत्याही प्रभारांमध्ये किंवा शुल्कांमध्ये बदल करण्याचा किंवा नवीन प्रभार अथवा शुल्क सुरू करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

### D. व्याजमुक्त कालावधी

विशिष्ट क्रेडिट कार्डावर लागू असणाऱ्या योजनेच्या (कृपया प्रभारांच्या अनुसूचीचा संदर्भ घ्या) आणि मर्चन्टद्वारे दावा सादर करण्याच्या सापेक्ष व्याजमुक्त पत कालावधी हा 20 ते 50 दिवसांच्या दरम्यान असेल. तथापि, मागील महिन्याच्या शिलकीचा पूर्णतः भरणा केलेला नसल्यास किंवा कार्ड सभासदाने एटीएममधून रोख रक्कम काढलेली असल्यास, हे लागू नाही. उदाहरणार्थ, एचडीएफसी बँक इंटरनॅशनल प्लॅटिनम प्लस कार्डावर 50 दिवसांपर्यंतचा व्याजमुक्त पत कालावधी आहे. म्हणजेच महिन्याची 4 तारीख ही देयक तारीख असणारा ग्राहक हा 5 एप्रिलपासून 4 मेपर्यंत त्याच्या कार्डावर खर्च करू शकतो, त्याचे देयक 4 मे रोजी तयार होईल आणि देयक भरण्याची नियत दिनांक ही 24 मे असेल. अशा प्रकारे 14 एप्रिलला करण्यात आलेल्या खरेदीकरिता 41 दिवसांचा पत कालावधी असेल, तर 2 मे रोजी करण्यात आलेल्या खरेदीकरिता 23 दिवसांचा पत कालावधी असेल. मागील देय रकमा पूर्णतः भरलेल्या असल्यास आणि मागील महिन्यांपासून पुढे नेण्यात आलेली अशी कोणतीही अनपेड (चुकती न केलेली) शिल्लक नसल्यास, हा कालावधी व्याजमुक्त असेल.

## 2. मर्यादा

एचडीएफसी बँक ही तिच्या स्वेच्छानिर्णयानुसार कार्ड सभासदाची पत मर्यादा आणि रक्कम काढण्याची मर्यादा निश्चित करेल. (ॲड–ऑन कार्ड सभासद हे तीच मर्यादा राखतील).

कार्ड प्रदान करण्याच्या वेळी आणि मासिक विवरणांमध्ये कार्ड सभासदांना ह्या मर्यादेबद्दल कळविण्यात येईल. विवरण तयार करण्याच्या वेळी उपलब्ध असलेली पत मर्यादा ही मासिक विवरणाचा भाग म्हणून प्रदान करण्यात येते. एचडीएफसी बँक ही ठरावीक कालावधीने कार्ड सभासदाच्या खात्याचा आढावा घेईल, आणि ती अंतर्गत निकषानुसार कार्ड सभासदाच्या मर्यादेमध्ये घट करू शकेल. अशा बाबतीत बँक त्यामागच्या कारणासह, एसएमएसद्वारे/ईमेलद्वारे आणि त्यानंतर लिखित स्वरूपात कळवेल. आपली पत मर्यादा वाढविण्यास इच्छुक असणारे कार्ड सभासद हे बँकेला लिखित स्वरूपात कळवून तसेच आपले उत्पन्न घोषित करणारे वित्तीय दस्तऐवज प्रदान करून तसे करू शकतील. बँक ही तिच्या स्वेच्छानिर्णयानुसार आणि असे नवीन दस्तऐवज प्रदान करण्याच्या आधारावर, कार्ड सभासदाची पत मर्यादा वाढवू शकतील.

## 3. वित्तीय प्रभार

- कार्ड सभासदाने त्याची शिल्लक पूर्णतः न भरण्याच्या बाबतीत, आणि कार्ड सभासदाद्वारे घेण्यात आलेल्या सर्व अग्रिम रोख रकमांवर, त्या पूर्णतः भरण्यात येईपर्यंत, व्यवहाराच्या तारखेपासून सर्व व्यवहारांवर मासिक टक्केवारी दराने वित्तीय शुल्क प्रदेय असेल. वित्तीय प्रभार, प्रदेय असल्यास, कार्डावरील थकित रक्कम पूर्णतः भरण्यात येईपर्यंत कार्ड सभासदाच्या खात्यामधून डेबिट करण्यात येईल.
- अग्रिम रोख रकमेवरील वित्तीय शुल्क हे व्यवहाराच्या तारखेपासून ते रक्कम पूर्णतः भरेपर्यंत लागू असेल.
- ग्राहकाने कोणतीही थकित रक्कम कॅरी फॉरवर्ड (अग्रेनित) केल्यास किंवा

अग्रिम रोख रक्कम प्राप्त केल्यास, सरासरी दैनंदिन शिल्लक पद्धतीद्वारे परिगणित करण्यात आलेला वित्तीय प्रभार हा कॅरी फॉरवर्ड करण्यात आलेल्या शिलकीसाठी आणि नव्या देयकांसाठी लागू असेल.

- कार्डधारकाने एचडीएफसी बँक क्रेडिट कार्डाच्या परिक्रामी पत सुविधेचा लाभ घेतल्यास आणि मासिक देयक विवरणामध्ये दिसून आलेल्या एकूण देय रकमेपेक्षा कमी रकमेचा भरणा करण्याचा पर्याय निवडल्यास, संपूर्ण थकित रकमेवर वित्तीय प्रभार लागू होईल आणि मागील थकित रक्कम पूर्णतः भरण्यात येईपर्यंत सर्व नवीन व्यवहारांवर वित्तीय प्रभारदेखील लागू होईल.

- भरणा नियत तारखेपर्यंत किमान देय रक्कम न भरल्यास भरणा विलंब शुल्क लागू असेल, भरणा विलंब शुल्क टाळण्यासाठी, भरणा निधी हा एचडीएफसी बँक कार्ड खात्यामध्ये भरणा नियत तारखेला किंवा त्यापूर्वी जमा करणे गरजेचे आहे. भरणा विलंब शुल्क पुढीलप्रमाणे लागू असेल:

| विवरण शिल्लक प्रभार | विलंब भरणा |
|---|---|
| रु.100/- पेक्षा कमी | – शून्य |
| रु.100/- ते रु.500/- | – रु.100/- |
| रु.501/- ते रु.5000/- | – रु.400/– |
| रु.5001/- ते रु.10000/- | – रु.500/- |
| रु.10001/- ते रु.20000/- | – रु.500/- (1 जानेवारी 2016 पासून रु.700/-) |
| रु.20001/- आणि त्यापेक्षा अधिक | – रु.700/- |

- पत मर्यादेपेक्षा अधिकच्या एकूण थकित रकमेवर ओव्हरलिमिट प्रभार हे ओव्हरलिमिट रकमेच्या 2.5% दराने आणि किमान रु.500/- च्या सापेक्ष लागू असतील.

**पुढील स्पष्टीकरण हे विविध प्रभार परिगणित करण्याची पद्धत दर्शविते**

असे गृहीत धरा की तुम्ही मागील सर्व देय रकमा पूर्णतः भरलेल्या आहेत आणि तुमच्या प्लॅटिनम प्लस कार्ड खात्यामध्ये कोणतीही रक्कम थकित नाही. तुमची विवरण तारीख प्रत्येक महिन्याची 18 अशी आहे. तुमच्या कार्ड खात्यावर तुम्ही केलेल्या व्यवहारांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| दिनांक | व्यवहार | रक्कम |
|---|---|---|
| 10 एप्रिल | घरगुती सामानाची खरेदी | रु.15000/- |
| 15 एप्रिल | गारमेन्ट्स आणि ॲक्सेसरीजची खरेदी | रु.5000/- |
| 18 एप्रिल | विवरण तारीख | एकूण देय रक्कम = रु.20000/- |
| | | किमान देय रक्कम = रु.1000/- |
| 12 मे | कार्ड खात्यामध्ये भरणा (येथे भरणा विलंब शुल्क लागू असेल) | रु.2000/- (क्रेडिट) |
| 14 मे | किराणामालाची खरेदी | रु.1000/- |
| 15 मे | कार्ड खात्यामध्ये भरणा | रु.15000/- (क्रेडिट) |

अशा प्रकारे, 18 मे ह्या विवरण तारखेला, तुमच्याकडून प्रदेय असणाऱ्या एकूण रकमेचे घटक म्हणून पुढील गोष्टी प्रतिबिंबित होतील:

परिगणित करण्यात आलेले व्याज: (थकित रक्कम X 3.49% प्रती महिना X12 महिने X दिवसांची संख्या)

भरणा विलंब शुल्क: रु.500/-

म्हणून,

a) 19 एप्रिल ते 11 मे ह्या कालावधीसाठी (म्हणजेच 23 दिवसांसाठी) 3.49% प्रती महिना दराने रु.15000/- वरील व्याज: रु.395.85/-

12 मे ते 14 मे ह्या कालावधीसाठी (म्हणजेच 3 दिवसांसाठी) 3.49% प्रती महिना दराने रु.13000/- वरील व्याज: रु.44.75/-

19 एप्रिल ते 14 मे ह्या कालावधीसाठी (म्हणजेच 26 दिवसांसाठी) 3.49% प्रती महिना दराने रु.5000 वरील व्याज: रु.149.16/-

15 मे ते 18 मे ह्या कालावधीसाठी (म्हणजेच 4 दिवसांसाठी) 3.49% प्रती महिना दराने रु.3000/- वरील व्याज: रु.13.77/-

14 ते 18 मे ह्या कालावधीसाठी (म्हणजेच 5 दिवसांसाठी) 3.49% प्रती महिना दराने (ताजा खर्च) रु.1000/- वरील व्याज: रु.5.74/-

अशा प्रकारे एकूण व्याज रु.609.27/-

b) भरणा विलंब प्रभार: रु.500/-

c) व्याज आणि इतर प्रभारांवरील सेवा कर @ 4%, स्वच्छ भारत उपकर ऽ 0.5%, आणि कृषी कल्याण उपकर @ 0.5% = रु.166.39/-

d) एकूण थकित मुद्दल रक्कम= रु.4000/-

(रु.1000/- ताजा खर्च + गेल्या महिन्याच्या देयक कालावधीपासून रु.3000/- ची थकित शिल्लक)

म्हणून एकूण देय रक्कम= (a) + (b) + (c) + (d) = रु.5275.70/-

कृपया ह्याची नोंद घ्या की वित्तीय प्रभार आणि इतर प्रभार हे एचडीएफसी

कृपया ह्याची नोंद घ्या की वित्तीय प्रभार आणि इतर प्रभार हे एचडीएफसी बँकेच्या स्वेच्छानिर्णयाच्या अधीन आहेत.

तसेच कृपया ह्याची नोंद घ्या की कार्ड सभासदाने खात्याची पत मर्यादा ओलांडल्यास, खात्यावर ओव्हरलिमिट प्रभार आकारण्यात येतील. विशिष्ट स्थितींमध्ये आकारण्यात येऊ शकणाऱ्या प्रभारांच्या सूचीसाठी, कृपया ह्या दस्तऐवजांच्या अखेरीस उपलब्ध असणाऱ्या प्रभारांच्या अनुसूचीचा संदर्भ घ्या.

**4. देयक आणि विवरण**

A. एचडीएफसी बँक ही गेल्या महिन्यापासून कार्ड सभासदाच्या खात्यामध्ये जमा करण्यात आलेली भरणा रक्कम आणि डेबिट करण्यात आलेली रक्कम दर्शविण्यासाठी कार्ड सभासदाला मासिक विवरण पाठवेल. कार्ड सभासदाने बँकेकडे नोंदवलेल्या टपाल मत्त्यावर, बँकेकडून दर महिन्याला पूर्वनिश्चित तारखेला कार्ड खात्यामधील व्यवहारांचे विवरण पाठविण्यात येईल. जर गेल्या महिन्यापासून थकित शिल्लक ही रु.200/- पेक्षा कमी असल्यास आणि देयकामध्ये नमूद करावयाचे असे कोणतेही पुढील व्यवहार बाकी नसल्यास, कोणतेही विवरण निर्गमित करण्यात येणार नाही.

B. एचडीएफसी बँकेचे क्रेडिट कार्ड्स हे रिव्हॉल्विंग (परिक्रामी) क्रेडिटची सुविधा देऊ करतील. कार्ड सभासद हे विवरणामध्ये छापण्यात आलेली फक्त किमान देय रक्कम भरण्याचा पर्यायही निवडू शकतील. थकित शिल्लक ही तद्नंतरच्या विवरणामध्येही कॅरी फॉरवर्ड करता येऊ शकते. कार्ड सभासद हा एकूण देय रक्कम भरण्याचा किंवा किमान देय रकमेपेक्षा अधिक अशी आंशिक रक्कम भरण्याचा पर्याय निवडू शकतील. सदर रक्कम ही भरणा नियत तारखेच्या आधी भरण्यात यायला हवी. भरणा विलंब शुल्क टाळण्यासाठी भरणा नियत तारखेला किंवा त्यापूर्वी एचडीएफसी बँकेच्या कार्ड खात्यामध्ये सदर रक्कम जमा होणे गरजेचे आहे. भरणा नियत तारखेच्या आत कार्ड खात्यामध्ये रक्कम जमा होण्याची खातरजमा करण्यासाठी, कार्डधारकाने भरणा नियत तारखेच्या खूप आधी स्थानिक धनादेश जमा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. मागील विवरणांमधील कोणतीही न भरलेली किमान देय रक्कम ही कार्ड सभासदाची पत मर्यादा ओलांडणाऱ्या थकित रकमेसोबत सध्याची किमान देय रक्कम जोडण्यात येईल.

C. कार्डाच्या थकित रकमेप्रती करण्यात आलेला भरणा हा तदनंतरच्या विवरणांमध्ये अभिस्वीकृत करण्यात येईल.

D. कार्ड सभासदाच्या कार्डावरील थकित रकमेप्रती प्राप्त झालेल्या रकमेची जुळवणी सर्व कर, शुल्क आणि इतर प्रभार, व्याजविषयक प्रभार, अग्रिम रकमा आणि खरेदी ह्या क्रमानुसार करण्यात येईल.

E. कार्ड खात्याप्रती पुढील पद्धतींद्वारे भरणा करण्यात येऊ शकेल:

(i) कार्ड सभासदाचे एचडीएफसी बँकेमध्ये खाते असल्यास तो नेटबँकिंग, एटीएम्स, किंवा फोन बँकिंग ह्या माध्यमांतून भरणा करू शकतो.

(ii) कार्ड सभासदाचे एचडीएफसी बँकेमध्ये खाते असल्यास, तो स्थायी सूचना सुविधेचा वापर करू शकतो ज्यामध्ये कार्ड सभासदाच्या एचडीएफसी बँक खात्यामधून कार्ड सभासदाच्या कार्ड खात्यामध्ये नियत तारखेला निधीचे स्वयंचलितपणे हस्तांतरण होऊ शकेल.

(iii) ग्राहक हा इतर बँकांमधील खात्याद्वारे एनईएफटी निधी हस्तांतरण पद्धतीच्या माध्यमातून (आयएफएससी कोड एचडीएफसी 0000128 वापरून) किंवा व्हिसा वित्त हस्तांतरण सुविधेचा वापर करून भरणा करू शकतो.

(iv) कार्ड सभासदाचे एचडीएफसी बँकेमध्ये खाते नसल्यास, तो इतर बँकांच्या नेटबँकिंग खात्याचा वापर करून बिल डेस्क फॅसिलिटीद्वारे भरणा करू शकतो.

(v) एचडीएफसी बँकेच्या शाखांमध्ये आणि एटीएम्समध्ये ठेवण्यात आलेल्या कोणत्याही एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड ड्रॉप बॉक्सेसमध्ये भरणा संलेख (धनादेश किंवा ड्राफ्ट) प्रदान करून ग्राहक भरणा करू शकतो. धनादेश/ड्राफ्ट हा एचडीएफसी बँक कार्ड क्रमांक xxxx xxxx xxxx xxxx वर प्रदेय असायला हवा.

(vi) बँकेच्या शाखांच्या ठिकाणी रोख रक्कम भरून भरणा करता येऊ शकतो.

F. देयकविषयक विवाद: कार्ड सभासदाला विवरणामध्ये कोणतीही तफावत आढळल्यावर, त्याने विवरण तारखेपासून 60 दिवसांच्या आत लिखित स्वरूपात त्याबाबत एचडीएफसी बँकेला न कळविल्यास विवरणामधील सर्व मजकूर योग्य असल्याचे आणि तो कार्ड सभासदाने स्वीकारल्याचे मानण्यात येईल. अशी माहिती प्राप्त झाल्यावर, अन्वेषण प्रलंबित म्हणून एचडीएफसी बँक ही तात्पुरत्या कालावधीसाठी प्रभार प्रत्यावर्तित (रिव्हर्स) करेल. तदनंतरचे अन्वेषण पूर्ण झाल्यावर, अशा प्रभारांचे दायित्व हे कार्ड सभासदाच्या खात्यावर टाकण्यात येईल, आणि संबंधित रिट्रिव्हल रिक्वेस्ट प्रभारांसह सदर प्रभार हा तदनंतरच्या विवरणामध्ये पुनःस्थापित करण्यात येईल. ग्राहकाकडून/ग्राहकांकडून विवाद प्राप्त झाल्यावर, कमाल 60 दिवसांच्या कालावधीच्या आत, व्हिसा/मास्टर कार्ड/डायनर्स क्लब इत्यादींसारख्या संबंधित फ्रॅन्चायझीद्वारे घालून देण्यात आलेल्या कार्यकारी मार्गदर्शकतत्त्वांच्या सापेक्ष, जेथे लागू असेल तेथे आणि सदस्य बँकेकडून प्राप्त झाल्यावर, आवश्यक तो/ते दस्तऐवज बँकेकडून प्रदान करण्यात येतील.

G. संपर्क तपशील: कोणत्याही चौकशीसाठी किंवा तक्रार निवारणासाठी कार्ड सभासद हा एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड विभागाशी पुढील माध्यमांद्वारे संपर्क साधू शकतील:

- 24 तास कार्यरत ग्राहक सेवा कॉल सेंटर– ह्या दस्तऐवजाच्या अखेरीस आणि मासिक विवरणाच्या मागच्या बाजूला दूरध्वनी क्रमांकांची तपशीलवार यादी देण्यात आलेली आहे.
- टपालाद्वारे– व्यवस्थापक, एचडीएफसी बँक कार्ड विभाग, पी.ओ.बॉक्स

8654, थिरुवानिमियूर, पी.ओ.चैन्नई– 600 041

- ईमेलद्वारे– customerservices.cards@hdfcbank. com

**5. डिफॉल्ट**

डिफॉल्टच्या बाबतीत, कार्ड खात्यावरील कोणत्याही थकित रकमेच्या हिशेबपूर्तीसाठी स्मरण, पाठपुरावा करण्याकरिता आणि देय रकमा गोळा करण्याकरिता टपालाद्वारे, फॅक्सद्वारे, दूरध्वनीद्वारे, ईमेलद्वारे, एसएमएसद्वारे आणि/किंवा त्रयस्थ पक्षाची मदत घेऊन कार्ड सभासदाला वेळोवेळी स्मरण करून देण्यात येईल. नियुक्त करण्यात आलेला असा त्रयस्थ पक्षकार हा देय रकमेच्या वसुलीबाबतच्या आचार संहितेचे पूर्णतः पालन करेल.

**6. धारणाधिकार**

कार्ड खात्यावरील शिल्लक रक्कम विहित वेळेमध्ये न भरल्यास, बँकेकडे, कोणत्याही वेळी आणि कोणतीही सूचना न देता, बँकेद्वारे मागणी करण्यात आल्यावर, कार्ड सभासदाच्या मालकीची सर्व रक्कम वजा करून घेण्याचा आणि/किंवा बँकेच्या कोणत्याही खात्यामध्ये/ताब्यामध्ये त्याची जी कोणतीही जमा आहे त्यामधील सर्व रक्कम काढण्याचा धारणाधिकार आणि हक्क आहे.

**7. कार्ड सभासदत्वाची समाप्ती/कार्ड सभासदत्व रद्द करणे**

A. कार्ड सभासद हा कार्ड तिरप्या रेषेमध्ये (कर्णरेषेमध्ये) कापून तसेच व्यवस्थापक, एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड्स, पी.ओ.बॉक्स 8654, थिरुवानिमियूर, पी.ओ.चैन्नई– 600 041 ह्या पत्त्यावर लिखित स्वरूपात कळवून कोणत्याही वेळी आपले कार्ड सभासदत्व समाप्त करू शकतो. लिखित विनंती प्राप्त झाल्यावर सर्व कार्ड्सची सेवा ह्यामध्ये ॲड–ऑन कार्ड्स समाविष्ट, संपुष्टात आणण्यात येईल. केवळ कापलेली कार्ड्स प्राप्त झाल्यावर आणि कार्ड खात्यावरील सर्व थकित रकमाचा भरणा करण्यात आल्यावर कार्ड समाप्ती प्रभावी होईल. यथाप्रमाण तत्त्वावर कोणतेही वार्षिक, सहभाग किंवा नुतनीकरण शुल्क परत करण्यात येणार नाही.

B. बँकेला कार्डाच्या वापरामध्ये कोणतेही असामान्य किंवा अस्वाभाविक व्यवहार स्वरूप दिसून आल्यास, कार्ड व्यवहाराच्या वास्तविकतेची पडताळणी करण्यासाठी बँकेच्या नोंदीमध्ये उपलब्ध असणाऱ्या ग्राहकाच्या दूरध्वनी क्रमांकावर ग्राहकाशी संपर्क साधण्याचा बँकेकडून प्रयत्न करण्यात येईल. बँक ग्राहकाशी संपर्क साधू न शकल्यास, कार्डधारकाच्या हितासाठी आणि/किंवा सुरक्षितेच्या कारणांस्तव आवश्यक असल्याचे बँकेला रास्तपणे वाटल्यास, बँक पुढे कोणतीही सूचना न देता कार्डाच्या वापरावर मर्यादा आणू शकेल/कार्डाचा वापर संपुष्टात आणू शकेल.

कार्ड सभासदाने देय रकमेबाबत डिफॉल्ट केल्यास किंवा विस्तारित पत मर्यादा ओलांडल्यास, एचडीएफसी बँक ही क्रेडिट कार्डावरील सुविधा स्थगित करू शकेल. करार संपुष्टात आल्यानंतर किंवा कार्ड खाते स्थगित करण्यात आल्यानंतर, क्रेडिट कार्डाचा वापर करू नये.

C. अशा स्थितीमध्ये, कार्ड सभासदाने खात्यावरील एकूण थकित शिल्लक एचडीएफसी बँकेला ताबोडतोब प्रदान करणे आवश्यक आहे (कोणत्याही डिफॉल्टच्या किंवा कायद्याने आवश्यक असलेल्या कोणत्याही नोटिशीच्या सापेक्ष). ह्यामध्ये कराराच्या अंतर्गत देय असणाऱ्या सर्व रकमा, तसेच खात्यावर अद्याप आकारणे बाकी असलेले सर्व व्यवहार आणि इतर रकमा समाविष्ट आहेत. कार्ड सभासदाने अशा सर्व देय रकमा भरल्याखेरीज कार्ड बंद झाल्याचे मानण्यात येणार नाही.

D. कार्ड सभासदाला तसेच ॲड–ऑन ग्राहकाला निर्गमित करण्यात येणारे कार्ड हे कार्ड सभासदाचा मृत्यू किंवा अक्षमता, कार्ड सभासदाच्या कॉर्पोरेट मंडळाची नादारी/विसर्जन/दिवाळखोरी/ किंवा समापन ह्या कारणांच्या बाबतीत स्वयंचलितपणे रद्द होईल. कोणत्याही शासकीय/नियामक मंडळाच्या सूचनांनुसारही कार्ड खाते स्थगित होऊ शकेल. कार्ड सभासदाच्या मृत्यूच्या किंवा अक्षमतेच्या, नादारीच्या, दिवाळखोरीच्या, समापनाच्या किंवा शासकीय/नियामक मंडळांच्या सूचनेच्या बाबतीत, कार्ड खात्यावरील कोणतीही थकित रक्कम ही, यथास्थितीनुसार, ताबोडतोब देय असल्याचे मानण्यात येईल, आणि सर्व थकित रक्कम ताबोडतोब भरण्यासाठी कार्ड सभासदाच्या आबंधनाबाबत कोणताही पूर्वग्रह न ठेवता, प्रभावी कायद्यांनुसार सदर रकमेची वसुली करण्यासाठी बँक हक्कदार असेल.

**8. कार्ड हरवणे/कार्डाची चोरी होणे/कार्डाचा गैरवापर होणे**

A. मुख्य किंवा कोणतेही अतिरिक्त कार्ड गहाळ झाल्यास, हरवल्यास, त्याची चोरी झाल्यास, ते विरुपित झाल्यास, कार्ड मिळण्याची तारीख आली असताना ते प्राप्त न झाल्यास किंवा कार्ड सभासदाच्या परवानगीशिवाय क्रेडिट कार्डाचा वापर होत असल्याची त्याला/तिला शंका आल्यास, कार्ड सभासदाने त्वरित 24–तास कार्यरत कॉल सेंटरला सूचित करणे आवश्यक आहे. कार्ड हरविल्याची नोंद करण्यात आल्यास, मात्र त्यानंतर कार्ड सभासदाला ते सापडल्यास, कार्ड सभासदाने कोणत्याही परिस्थितीमध्ये त्याचा वापर करू नये. ॲड–ऑन कार्ड ही मुख्य कार्ड खात्यावर देण्यात येणारी विस्तारित सुविधा असल्याने, जेव्हा प्रमुख कार्ड हरवल्याची नोंद करण्यात येते, तेव्हा ॲड–ऑन कार्ड हे विधिअग्राह्य ठरते. तशाच प्रकारे, ॲड–ऑन कार्ड गहाळ झाल्याची नोंद करण्यात आल्यास, मुख्य कार्ड खाते आणि इतर ॲड–ऑन कार्ड्स विधिअग्राह्य ठरतात.

B. कार्ड हरवल्याची नोंद करण्याच्या आधी कार्ड खात्यावर करण्यात आलेल्या कोणत्याही व्यवहारांसाठी बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही, आणि कार्ड सभासद त्याकरिता पूर्णतः जबाबदार असेल. बँकेला कार्ड हरवल्याची योग्य सूचना प्राप्त झाल्यानंतर, कार्ड सभासदाची तदनंतरची जबाबदारी शून्य असेल. कार्ड हरवल्याचे किंवा कार्डाची चोरी झाल्याचे एचडीएफसी बँकेला कळविण्यासोबतच, कार्ड सभासदाने कार्ड हरवल्याची किंवा चोरी झाल्याची माहिती पोलिसांना देणे, एफआयआर दाखल करणे आणि पोलिस तक्रारीची अभिस्वीकृत प्रत प्रदान करणे

आवश्यक आहे.

C. कार्ड सभासदाच्या संमतीसह एखाद्याने पिन किंवा कार्ड प्राप्त करून किंवा अतिरिक्त कार्ड सभासदाद्वारे कार्डाचा गैरवापर होण्याच्या बाबतीत उद्भवू शकणाऱ्या सर्व नुकसानासाठी कार्ड सभासद उत्तरदायी असेल.

D. कार्ड सभासदाने फसवणुकीचे वर्तन केल्यास, सर्व नुकसानासाठी कार्ड सभासद उत्तरदायी असेल. कार्ड सभासदाने रास्त काळजीशिवाय कृती केल्यास, उद्भवू शकणाऱ्या सर्व नुकसानासाठी कार्ड सभासद उत्तरदायी असेल.

E. एचडीएफसी बँक ही कार्ड सभासदाला किंवा कोणत्याही अतिरिक्त कार्ड सभासदाला संदर्भ न देता, कार्ड किंवा पिन हरविण्याविषयी, चोरी होण्याविषयी किंवा त्यांचा गैरवापर होण्याविषयी बँकेला योग्य वाटेल ती माहिती पोलिसांना किंवा इतर संबंधित प्राधिकरणाला देऊ शकते.

F. क्रेडिट कार्डावरील कोणत्याही फसवणुकीच्या व्यवहारांच्या बाबतीत उद्भवणाऱ्या कोणत्याही दायित्वाची पूर्ती करण्यासाठी, कार्ड सभासद त्याच्या/तिच्या स्वतःच्या इच्छेनुसार पर्यायी विमा उत्पादन सुविधेचा वापर करु शकतो. अशा विमा छत्रासंबंधित अधिक माहितीसाठी आणि अटी व शर्तींसाठी, कृपया बँकेच्या प्रतिनिधीशी संपर्क साधा.

### 9. रिवॉर्ड पॉइंट्सची वैधता

रिवॉर्ड पॉइंट्स प्राप्त झाल्याच्या तारखेपासून 2 वर्षांसाठी वैध राहतील, उदा:– तुम्हांला मे 2015 मध्ये रिवॉर्ड पॉइंट्स प्राप्त झाल्यास, मे 2017 मध्ये त्यांची मुदत संपेल.

### 10. तक्रार कक्ष

तुमच्याकडून बँकेला साधण्यात आलेल्या अलीकडच्या संपर्काला, बँकेकडून देण्यात आलेल्या प्रतिसादाने तुमचे समाधान न होण्याच्या दुर्मिळ घटनेच्या बाबतीत, तुम्ही व्यवस्थापक, तक्रार कक्ष, एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड्स विभाग, 8. लॅटिस ब्रिज रोड, थिरुवानिमियूर, चैन्नई– 600 041 ह्यांच्याशी संपर्क साधू शकता, किंवा आम्हांला सोमवार ते शुक्रवार ह्यादरम्यान सकाळी 09.30 ते 05.30 ह्या वेळेमध्ये 044–23625600 ह्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकता.

### 11. प्रकटन

कार्ड सभासद हे अभिस्वीकृत करतो की विद्यमान व्यवसाय कार्यपद्धतींप्रमाणे, बँक ही वेळोवेळी क्रेडिट कार्डाशी (कार्डांशी) संबंधित कोणतीही माहिती, ग्राहकाला कोणतीही सूचना न देता कोणत्याही क्रेडिट ब्युरो (विद्यमान किंवा भविष्यातील) देऊ शकते. क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो इंडिया लि. (सिबिल) म्हणजे वित्तीय प्रणालीची कार्य स्थिती आणि स्थिरता ह्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी भारतीय शासनाद्वारे आणि भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे सुरू करण्यात आलेला एक उपक्रम आहे. ह्या उपक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व बँकांनी आणि वित्तीय संस्थांनी सिबिलसोबत/क्रेडिट ब्युरोजसोबत ग्राहकाच्या माहितीचे आदानप्रदान करणे आवश्यक आहे आणि ही माहिती क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपनी नियमन अधिनियम, 2005 च्या परिभाषेमध्ये प्रदान करण्यात येते. हे लक्षात घेऊन, आम्ही कार्ड सभासदाला हे कळविण्यास इच्छुक आहोत की कार्ड सभासदाची रक्कम थकित असल्यास, यथोचित सूचना देऊन, बँक ही ग्राहकाकडून क्रेडिट कार्डाच्या (कार्डांच्या) संबंधात करण्यात आलेल्या डिफॉल्टची कोणतीही माहिती ही सिबिलला आणि क्रेडिट ब्युरोला (विद्यमान) देऊ शकते. थकित कार्ड खात्याप्रती प्रदान करण्यात येणाऱ्या भरणा रकमेची अद्ययावत माहिती बँकेला रक्कम प्राप्त झाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत सिबिलमध्ये/इतर क्रेडिट ब्युरोजमध्ये प्रतिबिंबित होईल. बँकेला योग्य वाटेल त्याप्रमाणे, तक्रारीशी संबंधित संवादाच्या किंवा भरणा रकमेच्या वसुलीशी संबंधित संवादाच्या किंवा इतर कोणत्याही संवादाच्या बाबतीत, आम्ही कार्ड सभासदाला हेदेखील कळविण्यास इच्छुक आहोत की, बँक ही तिच्या स्वतःच्या इच्छेनुसार, कार्ड सभासद आणि बँकेचा प्रतिनिधी ह्यांच्यामधील विशिष्ट संवादाची नोंद करेल. निवडक क्रेडिट कार्ड प्रकारांमध्ये कार्डावर कॉम्प्लिमेन्टरी विमा छत्र प्रदान करण्यात येते. क्रेडिट कार्ड स्थापित झाल्याच्या तारखेपासून पॉलिसी कव्हरेज सुरू होते. अधिक माहितीसाठी व अटी आणि शर्तींसाठी, कृपया वापरकर्ता पुस्तिकेचा संदर्भ घ्या.

निवडक क्रेडिट कार्ड प्रकारांवर वन असिस्टकडून पहिल्या वर्षासाठी कॉम्प्लिमेन्टरी सभासदत्व प्रदान करण्यात येते. तुमच्या क्रेडिट कार्डाची डिलिव्हरी केल्यापासून एका आठवड्याच्या आत सभासदत्व नोंदणी होईल. अधिक माहितीसाठी, कृपया वेलकम किटचा संदर्भ घ्या.

### 12. सर्वांत महत्त्वपूर्ण अटी व शर्ती प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध

प्रादेशिक भाषांमधील एमआयटीसीबाबत अधिक माहितीसाठी कृपया www.hdfcbank.com ला भेट द्या.उपलब्ध पर्याय

1) हिंदी 2) कन्नड 3) मल्याळम 4) तेलगू 5) तामिळ 6) बंगाली

7) मराठी 8) गुजराती 9) पंजाबी 10) ओरिया 11) आसामी

12) उर्दू 13) सिंधी.

# प्रभारांची अनुसूची

| प्रभारांचे वर्णन | जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक डायनर्स क्लब/रिगेलीआ/बिझनेस रिगेलीआ/डॉक्टर्स रिगेलीआ/डायनर्स क्लब प्रिमियम/जेट प्रिव्हिलेज वर्ल्ड/ऑल माइल्स/डॉक्टर्स सुपिरीया | डायनर्स क्लब रिवॉर्ड्झ/टाइम्स प्लॅटिनम कार्ड/ जेट प्रिव्हिलेज प्लॅटिनम/सॉलिटेयर/प्लॅटिनम एज/मनीबॅक/बिझनेस मनी बॅक/ जेट प्रिव्हिलेज टायटॅनियम/टाइम्स टायटॅनियम कार्ड/टीचर्स प्लॅटिनम/बिझनेस प्लॅटिनम/स्नॅपडील एचडीएफसी बँक कार्ड |
|---|---|---|
| व्याजमुक्त कालावधी | 50 दिवसांपर्यंत | 50 दिवसांपर्यंत |
| किमान परतफेड रक्कम | 5%, किमान रु.200/- | 5%, किमान रु.200/- |
| रोकड अग्रिम मर्यादा | पत मर्यादेच्या 40% | पत मर्यादेच्या 40% |
| वार्षिक/नुतनीकरण शुल्क: | रिगेलीआ/बिझनेस रिगेलीआ/डॉक्टर्स रिगेलीआ – रु.2500/- रु.2500/-<br>डायनर्स क्लब प्रिमियम – रु.2500/-<br>जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक वर्ल्ड – रु.2500/-<br>ऑल माइल्स/डॉक्टर्स सुपिरिया – रु.1000/-<br>जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक डायनर्स क्लब – रु.10000/- रु.5000/- | डायनर्स क्लब रिवॉर्ड्झ – रु.1000/-<br>जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक प्लॅटिनम/ टाइम्स प्लॅटिनम कार्ड – रु.1000/-<br>सॉलिटेयर/प्लॅटिनम एज/मनीबॅक/जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक टायटॅनियम – रु.500/-<br>टाइम्स टिटॅनियम कार्ड/टीचर्स प्लॅटिनम/बिझनेस मनी बॅक/स्नॅपडील एचडीएफसी बँक कार्ड – रु.500/-<br>बिझ्रेस प्लॅटिनम – रु.299/- |
| वार्षिक प्रभारांच्या वेव्हरसाठी (अधित्याग करण्यासाठी) खर्चाची स्थिती खालील व्यवहार वगळता<br>• कॅश ऑन कॉल<br>• शिल्लक हस्तांतरण<br>• रोख रक्कम काढणे | **बिझनेस प्लॅटिनम**<br>कार्ड स्थापित केल्यापासून पहिल्या 90 दिवसांच्या आत रु.5,000/- खर्च करा आणि 1 ल्या वर्षाचे सभासद शुल्क प्रत्यावर्तित (रिव्हर्स) करून घ्या.<br>एका वर्षामध्ये रु.30,000/- खर्च करा आणि पुढील वर्षाचे वार्षिक सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>**सॉलिटेयर/टायटॅनियम एज/प्लॅटिनम एज/मनीबॅक/बिझनेस मनी बॅक**<br>कार्ड स्थापित केल्यापासून पहिल्या 90 दिवसांच्या आत रु.10,000/- खर्च करा आणि 1 ल्या वर्षाचे सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>एका वर्षामध्ये रु.50,000/- खर्च करा आणि पुढील वर्षाचे वार्षिक सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>**ऑल माइल्स/डॉक्टर्स सुपिरिया/डायनर्स क्लब रिवॉर्ड्झ**<br>कार्ड स्थापित केल्यापासून पहिल्या 90 दिवसांच्या आत रु.15,000/- खर्च करा आणि 1 ल्या वर्षाचे सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>एका वर्षामध्ये रु.1,00,000/- खर्च करा आणि पुढील वर्षाचे वार्षिक सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>**रिगेलीआ/बिझनेस रिगेलीआ/डॉक्टर्स रिगेलीआ/डायनर्स क्लब प्रिमियम**<br>कार्ड स्थापित केल्यापासून पहिल्या 90 दिवसांच्या आत रु.40,000/- खर्च करा आणि 1 ल्या वर्षाचे सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>एका वर्षामध्ये रु.3,00,000/- खर्च करा आणि पुढील वर्षाचे वार्षिक सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>**जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक टायटॅनियम/ टाइम्स टायटॅनियम कार्ड/स्नॅपडील एचडीएफसी बँक कार्ड**<br>एका वर्षामध्ये रु.1,50,000/- खर्च करा आणि पुढील वर्षाचे वार्षिक सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>**जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक प्लॅटिनम/टाइम्स प्लॅटिनम कार्ड**<br>एका वर्षामध्ये रु.2,50,000/- खर्च करा आणि पुढील वर्षाचे वार्षिक सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>**जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक वर्ल्ड**<br>एका वर्षामध्ये रु.3,00,000/- खर्च करा आणि पुढील वर्षाचे वार्षिक सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या.<br>**टीचर्स प्लॅटिनम**<br>कार्ड स्थापित केल्यापासून पहिल्या 90 दिवसांच्या आत रु.10,000/- खर्च करा आणि 1 ल्या वर्षाचे सभासद शुल्क प्रत्यावर्तित (रिव्हर्स) करून घ्या.<br>एका वर्षामध्ये रु.30,000/- खर्च करा आणि पुढील वर्षाचे वार्षिक सभासद शुल्क माफ (वेव्हर) करून घ्या. | |
| अतिरिक्त कार्ड शुल्क | आजन्म मोफत (3 कार्डांपर्यंत) | |
| रिव्हॉल्विंग (परिक्रामी) क्रेडिटवर प्रभार | जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक डायनर्स क्लब/डायनर्स ब्लॅक/इन्फिनिया प्रतिमहिना 1.99% म्हणजेच प्रतिवर्ष 23.88%<br>जेट वर्ल्ड प्रतिमहिना 1.99% म्हणजेच प्रतिवर्ष 23.88% (प्रतिमहिना 3.49% म्हणजेच प्रतिवर्ष 41.88%, जानेवारी'17 पासून प्रभावी)<br>रिगालिया/बिझनेस रिगालिया/डॉक्टर्स रिगालिया/बिझनेस रिगालिया फर्स्ट प्रतिमहिना 2.95% म्हणजेच प्रतिवर्ष 35.4%<br>रिगालिया फर्स्ट प्रतिमहिना 2.95% म्हणजेच प्रतिवर्ष 35.4% (प्रतिमहिना 3.49% म्हणजेच प्रतिवर्ष 41.88%, जानेवारी'17 पासून प्रभावी)<br>ईरं– कार्ड प्रदान करण्याच्या वेळी सुरुवातीचा व्याज दर 3.40% प्रतिमहिना म्हणजेच 40.8% (वार्षिक) इतका आहे. (प्रतिमहिना 3.49% म्हणजेच प्रतिवर्ष 41.88%, जानेवारी'17 पासून प्रभावी)<br>खर्च, पेबॅक आणि वापराचे स्वरूप ह्यानुसार त्यामध्ये ठरावीक कालावधीने बदल होऊ शकतो. डिफॉल्टच्या बाबतीत कमाल व्याज दर 3.5% प्रतिमहिना म्हणजेच 42% (वार्षिक) इतका आहे.<br>नियत ठेवीवर कार्ड प्रदान करण्याच्या बाबतीत– प्रतिमहिना 1.99% (वार्षिक 23.88%), व्यवहाराच्या तारखेपासून लागू. | |
| अग्रिम रोकड प्रभार | काढलेल्या रकमेच्या 2.5% किंवा रु.300/- जे अधिक असेल ते | काढलेल्या रकमेच्या 2.5% किंवा रु.300/- जे अधिक असेल ते |
| विलंब भरणा प्रभार<br>(मूलभूत क्रेडिट कार्ड देयक रक्कम) | <u>विवरण शिल्लक</u><br>रु.100/- पेक्षा कमी<br>रु.501/- ते रु.5,000/-<br>रु.5,001/- ते रु.10,000/-<br>रु.10,001/- ते रु.20,000/-<br>रु.20,001/- आणि त्यापेक्षा अधिक | <u>भरणा विलंब शुल्क</u><br>शून्य<br>रु.100/-<br>रु.400/-<br>रु.500/-<br>रु.500/-(1 जानेवारी 2016 पासून रु.700/-)<br>रु.700/- |
| ओव्हरलिमिट खात्यावरील प्रभार | ओव्हरलिमिट रकमेच्या 2.5%, किमान रु.500/- च्या सापेक्ष | ओव्हरलिमिट रकमेच्या 2.5%, किमान रु.500/- च्या सापेक्ष |
| भरणा परतावा शुल्क | भरणा रकमेच्या 2%, किमान रु.450/- च्या सापेक्ष | भरणा रकमेच्या 2%, किमान रु.450/- च्या सापेक्ष |
| रोकड प्रक्रिया शुल्क | रु.100/- (एचडीएफसी बँकेच्या शाखेमध्ये किंवा एटीएम्समध्ये रक्कम जमा करून केलेल्या सर्व कार्ड पेमेन्ट्ससाठी) | रु.100/- (एचडीएफसी बँकेच्या शाखेमध्ये किंवा एटीएम्समध्ये रक्कम जमा करून केलेल्या सर्व कार्ड पेमेन्ट्ससाठी) |
| रिवॉर्ड्स रिडेम्प्शन शुल्क | प्रत्येक रिडेम्प्शन विनंतीसाठी रु.75/-– जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक वर्ल्ड/ जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक डायनर्स क्लब ह्यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व कार्डांसाठी लागू. | प्रत्येक रिडेम्प्शन विनंतीसाठी रु.75/-– जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक प्लॅटिनम आणि जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक टायटॅनियम ह्यांच्याकरिता लागू नाही. |
| शिल्लक हस्तांतरण प्रक्रिया प्रभार | शिल्लक हस्तांतरण रकमेच्या 2% किंवा रु.250/-, जे अधिक असेल ते | शिल्लक हस्तांतरण रकमेच्या 2% किंवा रु.250/-, जे अधिक असेल ते |
| पेट्रोल व्यवहार अधिभार<br>(किमान रु.10 च्या सापेक्ष) | जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक डायनर्स क्लब/इन्फिनिया– प्रत्येक देयक आवर्तनाला रु.1000/- ला इंधन अधिभार वेव्हर मर्यादित (एसटी लागू). डायनर्स प्रिमियम, जेट वर्ल्ड, रिगेलीआ, डायनर्स रिवॉर्ड्स, जेट प्लॅटिनम, ऑल माइल्स, बिझनेस रिगेलीआ, डॉक्टर्स रिगेलीआ, बिझनेस मनीबॅक, बिझनेस प्लॅटिनम, टाइम्स प्लॅटिनम– प्रत्येक देयक आवर्तनाला रु.500/- ला इंधन अधिभार वेव्हर मर्यादित (एसटी लागू). इतर सर्व कार्ड्स– प्रत्येक देयक आवर्तनाला रु.250/- ला इंधन अधिभार वेव्हर मर्यादित (एसटी लागू). (15 ऑगस्ट 2014 पासून पीएसडब्ल्यूवर विवरण स्तर कॅपिंग). 15 एप्रिल 2016 पासून प्रभावी. रिवॉर्ड पॉइंट्स/जेपी माइल्स हे इंधन व्यवहारांवर उपार्जित होणार नाहीत. इंधन अधिभारावर आकारण्यात आलेला सेवा कर ना–परतावायोग्य आहे. | पुढील दरम्यानच्या व्यवहारांसाठी वेव्हर:<br>a) रिगेलीआ/बिझनेस रिगेलीआ/डॉक्टर्स रिगेलीआ ह्यांच्यासाठी रु.400/- ते रु.100000/-<br>b) इतर सर्व कार्डांसाठी रु.400/- ते रु.5000/-. 15 एप्रिल 2016 पासून प्रभावी. रिवॉर्ड पॉइंट्स/जेपी माइल्स हे इंधन व्यवहारांवर उपार्जित होणार नाहीत. इंधन अधिभारावर आकारण्यात आलेला सेवा कर ना–परतावायोग्य आहे. |
| रेल्वे तिकीट खरेदी शुल्क | रु.30/- + व्यवहार रकमेचे 2.5%. एचडीएफसी बँक पेमेन्ट गेटवेवर: 1.8% + सेवा कर<br>इतर बँकांच्या पेमेन्ट गेटवेवर: आयआरसीटीसी वेबसाइटप्रमाणे दर | |
| गहाळ, चोरी किंवा नुकसान झाल्यामुळे कार्ड पुन्हा प्रदान करणे | रु.100/- | रु.100/- |
| नगरबाह्य धनादेश प्रक्रिया प्रभार | रु.5000/- पर्यंतचा धनादेश– शुल्क रु.25/- असेल;<br>रु.5000/- पेक्षा अधिक रकमेचा धनादेश– शुल्क रु.50/- असेल. | रु.5000/- पर्यंतचा धनादेश– शुल्क रु.25/- असेल;<br>रु.5000/- पेक्षा अधिक रकमेचा धनादेश– शुल्क रु.50/- असेल. |
| विदेशी चलन व्यवहार | बँक प्रभार क्रॉस करन्सी मार्क अप 3.5% (रिगेलीआ/बिझनेस रिगेलीआ/डॉक्टर्स रिगेलीआ/जेट वर्ल्ड/ जेट प्रिव्हिलेज एचडीएफसी बँक डायनर्स क्लब/डायनर्स क्लब प्रिमियम ह्यांच्यासाठी 2%) | बँक प्रभार क्रॉस करन्सी मार्क अप 3.5%<br>(डायनर्स क्लब रिवॉर्ड्झसाठी 3.0%) |
| सेवा कर, स्वच्छ भारत उपकर आणि कृषी कल्याण उपकर | सर्व शुल्क, व्याज आणि इतर प्रभार ह्यांवर लागू असतील | सर्व शुल्क, व्याज आणि इतर प्रभार ह्यांवर लागू असतील |

## 24 तास कार्यरत ग्राहक संपर्क केंद्रे

अहमदाबाद/बंगळुरू/चैन्नई/दिल्ली ॲन्ड एनसीआर/हैदराबाद/कोलकाता/मुंबई/पुणे–6160 6161

चंदिगड/कोची/इंदूर/जयपूर/लखनौ– 6160 616

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | : 99494 93333 | मध्यप्रदेश/ छत्तीसगड | : 98936 03333 | राजस्थान | : 98750 03333 | बिहार/झारखंड/पटना | : 1860 266 6161 |
| आसाम | : 99571 93333 | महाराष्ट्र (मुंबई वगळता) आणि गोवा | : 98906 03333 | तामिळनाडू/पाँडिचेरी | : 98406 73333 | जम्मू आणि काश्मिर/ हिमाचल प्रदेश (बीएसएनएल लँडलाइनवरूल टोल–फ्री) | : 1800 103 9733 |
| गुजरात | : 98982 71111 | | : 99379 03333 | उत्तरप्रदेश/ उत्तराखंड | : 99359 03333 | मेघालय/त्रिपुरा/ नागालँड/मिझोराम/ अरुणाचल प्रदेश/मणिपूर (बीएसएनएल लँडलाइनवरूल टोल–फ्री) | : 1800 345 3333 |
| हरयाणा | : 99962 43333 | ओरिसा | : 98153 31111 | पश्चिम बंगाल/सिक्कीम/ अंदमान आणि निकोबार | : 98310 73333 | | |
| कर्नाटक | : 99458 63333 | पंजाब | | | | | |
| केरळ | : 98956 63333 | | | | | | |

**खालील ठिकाणांसाठी टोल फ्री क्रमांक : 1800 425 4332**

आग्रा / अजमेर / अलाहाबाद / बरेली / भुवनेश्वर / बोकारो / कटक / धनबाद / डेहराडून / इरोडे / गुवाहाटी / हिस्सर / जम्मू आणि श्रीनगर / जमशेदपूर / झाशी / जोधपूर / कर्नाळ / कानपूर / मदुराई / मँगलोर / मथुरा / मीरत / मोरादाबाद / मुझफरपूर / म्हैसूर / पाली / पटियाला / राजकोट / रांची / रौरकेला / सलेम / शिमला / सिलिगुडी / सिल्व्हासा / सुरत / त्रिची / उदयपूर / वाराणसी

आमच्या उत्पादनांविषयी किंवा सेवांविषयी माहिती देण्यासाठी तुमच्याशी संपर्क साधला जाऊ नये अशी तुमची इच्छा असल्यास, कृपया आमच्या www.hdfcbank.com ह्या वेबसाइटवर लॉग ऑन करा आणि आमच्या डोन्ट कॉल नोंदणी पर्यायावर तुमची नोंदणी करा. नुकत्याच तयार करण्यात आलेल्या विवरणामध्ये कार्ड खात्यावर भरणा विलंब शुल्क आकारण्यात आल्यास रोकड प्रक्रिया शुल्क माफ करण्यात येईल.

MITC_Ver_1.46 May' 16

HDFC BANK
We understand your world